शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर
दुरध्वनी क्रमांक :- 0241 2353694
ई-मेल आयडी :- ednprimary@gmail.com
वेबसाईट :- www.eduprimaryanagar.in
पत्ता :- नविन प्रशासकिय इमारत, माळीवाडा, अहिल्यानगर-414001

अहिल्यानगर, दि. 16/12/2024

**प्रसिध्दीप्रत्रक**

**विषय :- 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत ..**

वाचा :- 1.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.666/टिएनटि-1, दि. 23 सप्टेंबर, 2024
2.मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.आस्था-क/प्राथ-106/ 10 प शाळा/ शिक्षक/2024/6127, दि. 07/10/2024
3.या कार्यालयाकडील पत्र क्र.वशि/कार्या-1/पीई-1/1895/2024, दि. 05/12/2024
4.मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील व्हि. सी. दि. 05/12/2024 मधील समक्ष सूचना
5.या कार्यालयाकडील पत्र क्र.वशि/कार्या-1/पीई-1/2293/2024, दि. 09/12/2024

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि. 23 सप्टेंबर, 2024 रोजीचे शासन निर्णयान्वये व मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि. 07/10/2024 रोजीचे पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवाराची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार शिक्षक उमेदवाराची कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना दि. 05/12/2024 रोजीचे पत्रान्वये सविस्तर सुचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत.

सदर प्रकरणी मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि. 05/12/2024 रोजीचे व्हि.सी. मध्ये 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत पुढील आदेश होईपर्यत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असे निर्देशित केलेने याबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना दि. 09/12/2024 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तरी मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत 10 व 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्तीबाबत पुढील निर्देश प्राप्त झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल.

(मिना शिवगुंडे)
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**

**अहिल्यानगर जिल्हयातील**
**डी.एड., बी.एड. अर्हताधारक उमेदवार**

प्रत - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती .. .. .. .. .. (सर्व)